# शाश्वत विकासावर दृष्टीक्षेप

**प्रा. डॉ. सुरेन्द्र पोथारे**
*शरदचंद्र कला वाणिज्य महाविद्यालय बुटीबोरी*
*नागपूर*

***सारांशः-***
*शाश्वत विकास संकल्पना, शाश्वत विकासाची गरज, शाश्वत विकासाचे जागतिक प्रयत्न, शाश्वत विकासात भारताचा सहभाग व वाटचाल, 2015 मधील शाश्वत विकास उदिष्टे,शाश्वत विकासाच्या दृष्टीने भारताचे विश्लेषण.*

**प्रस्तावनाः-**

मानव जन्माला आल्यापासून त्याला जगण्यासाठी अन्न वस्त्र निवारा या प्राथमिक गरजांची निकट असते या त्याच्या प्राथमिक गरजा पूर्ण झाल्यावर तो इतर सुखभोग गरजांचा विचार करतो चांगले घर, घरात सुखकर वस्तूंना मिळविण्यासाठी प्रयत्न करीत असतो आपले जीवनमान कसे उंचावता येईल याचा तो विचार करतो निसर्गातून प्राप्त जास्तीत जास्त संसाधनाचा उपयोग करतो. पुर्वी मनुष्य पूर्णतः निसर्गाच्या अनुरूप जीवन जगत होता. हळूहळू त्याच्या जीवन जगण्याच्या शैलीत बदल होत गेला मानव आपले जीवनमान उंचावण्यासाठी व आयुर्मान वाढविण्यासाठी धडपडू लागला त्याच्या या धडपडीत त्याला धावण्याची सवय लागली तो फक्त स्वतःच्या स्वार्थाचा विचार करू लागला यात जंगलतोड, औद्योगीकरणाकडे वळला नी उपलब्ध संसाधनाचा उपयोग आपल्या लाभा करता कसा करता येईल याचा विचार करू लागला. त्याची धावण्याची गती प्रचंड वाढली या गतीमुळे निसर्गाचे नुकसान होऊ लागले याचा परिणाम पर्यावरणीय वातावरणावर दिसून आला ज्यात वायु प्रदूषण, ध्वनी प्रदूषण व भूखणन यासारख्या बदलाचा मोठा सहभाग आहे. म्हणून शाश्वत विकासाच्या संकल्पनेची आवश्यकता भासली. जीवन जगताना समाजातील व्यक्तीला अस्तित्व टिकवून ठेवण्याची गरज भासते त्यामुळे पर्यावरण, समाज व अर्थिक विकास याचाही विचार त्याने सोडून दिले परंतु जीवन जगताना आर्थिक विकास व पर्यावरण या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून आपण समाजाचे घटक आहोत याचा त्याला विसर पडतो. त्याच्या दृष्टिकोनाने पर्यावरण, संस्कृती , समाज व आर्थिक विकासाकडे तो दुर्लक्ष करू लागला परंतु विकास साधण्यासाठी या सर्व गोष्टी खुप उपयोगी पडतात या सर्व संसाधनांची ऱ्हस होवू नये म्हणून पर्यावरणाशी आपले नाते घनिष्ठ करणे आवश्यक आहे पर्यावरणाची हानी ही आर्थिक विकासाच्या कारणीभूत आहे हे ओळखून समाज, संस्कृती, पर्यावरण, अर्थकारण यांचा आपसात ताळमेळ असणे गरजेचे असते तसेच या सर्वत आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे लोकसंख्या, तिचा विचार करणे आवश्यक आहे जगाची लोकसंख्या सातशे कोटी पेक्षा जास्त आहे त्यात भारताची लोकसंख्या एकशे चाळीस कोटी इतकी अफाट आहे त्या लोकसंख्येच्या दृष्टीने लोकांच्या गरजा खुप जास्त आहे त्या पुर्ण करताना पर्यावरची मोठ्यी प्रमाणात हानी होत आहे विविध देशांतील लोकांचे जीवन वेगवेगळे आहे काही देश विकसित आहे तर काही विकसनशील तर काही अविकसनशील आहे या अविकसनशील व विकसनशील समुदायाला विकसित करण्यासाठी व त्यांच्या गरजा पुर्ण करुन त्यांचा विकास साधण्यासाठी व पुढल्या पिढी करती संसाधने उपलब्ध राहावी या हेतूने शाश्वत विकास ही संकल्पना1987मध्ये ब्रेडलैन्ड आयोगाने अहवालात मांडली. ज्याची परिभाषा करताना " शाश्वत विकास हा असा विकास आहे जो भविष्यातील पिढ्यांच्या स्वतःच्या गरजा पुर्ण करण्याच्या क्षमतेची तडजोड नकरता सध्याच्या पिढीच्या गरजा पुर्ण करतो" यात गरजा पुर्ण करताना भविष्यात व साध्या त्या पिढीला संसाधने पुरवणे सर्व एकत्र येऊन पुढल्या पिढीसाठी राखुन ठेवणें हा दृष्टिकोन दिसून येते . यात सर्वांना सोबत घेऊन जाण्याच्या दृष्टीने **(Living no one behinds)** ही संकल्पना मांडली म्हणजे' कुणीही मागे राहता कामा नये' व सोबतच पर्यावरणची संतुलन राखण्यासाठी व सर्वांचे आरोग्य, स्वच्छ पाणी उपलब्ध होईल या सारखी 17 ध्येय "शाश्वत विकासत" आस्तित्वात आली. ज्यासाठी जागतिक स्तरावर वेळोवेळी प्रयत्न केले जात आहेत.

**शाश्वत विकासाचे जागतिक प्रयत्नः-**

- 1985 संयुक्त राष्ट्र पर्यावरण आणि विकास परिषद **(UNCED)** ही व्हिएन्ना कॅान्व्हेन्शन ओझोनथराच्या संरक्षणासाठी 178 देशांनी करारांवर स्वाक्षरी केली

- 1987 ब्रेडलैन्ड आयोगाने अहवालात प्रथमच शाश्वत विकास संकल्पना मांडली व मार्गदर्शक तत्वे विकासीत केली. ती 2015 पर्यंत ते पुर्ण करण्याचें लक्ष ठेवण्यात आले.
- 1987 मॉन्ट्रियल प्रोटोकॉल हा ओझोन थराच्या स्थिरावणारे संरक्षण करण्यासाठी जागतिक स्तरावर स्वाक्षरी करण्यात आली ज्यात “आपले सामूहिक भविष्य” या अंतर्गत योजना आखल्या गेल्या.
- जुन 1992 वसुंधरा शिखर परिषद रिओ दि जानेरो ब्राझिल येथे आयोजित करण्यात आला ज्यात पर्यावरण व शाश्वत विकास अजेन्डा 21 हा शाश्वत विकासाशी संबंधित तयार करण्यात आला.
- 2000 संयुक्त राष्ट्राच्या सहस्त्र शिखर परिषद मध्ये पर्यावरणावर शाश्वत विकासावर अधिक भर देण्यात आला त्यात (**MDG**) या शिखर परिषदेत पर्यावरणावर 8 विकास लक्षे पूर्ण करण्यासाठी 2015 हा कालावधी निश्चित करण्यात आला व शाश्वत विकासावर अधिक भर देण्यात आला
- 2015 संयुक्त राष्ट्र महासभेच्या 70 व्या बैठकीत 2030 पर्यंत शाश्वत विकासाचा अजेंडा निश्चित करण्यात आला. 193 देशातील सदस्यांनी याला मान्यता दिली 17 विकास लक्ष्य निश्चित केली व ती 1 जानेवारी 2016 पासून लागू करण्यात आली. गरिबीचे पूर्णपणे उच्चाटन करणे आणि सामाजिक न्याय आणि संपूर्ण समानता प्रस्थापित करणे; कोणालाही मागे सोडू नका असे सांगण्यात आले
- 2016 मध्ये शाश्वत विकास लक्षे(**SDG**) ने **MDG** चे अनुवर्तन केले.
- 2020-2030 गेलांचा दिशेने मेकिंग द डिकेड काउंटी या संकल्पनेचा विचार करण्यात आला.
- 2021जागतिक शाश्वत विकास शिखर परिषद ज्यात आमचे सामान्य भविष्य पुन्हा परिभाषित करणे सर्वांसाठी सुरक्षित आणि सुरक्षित पर्यावरण ही संकल्पना मांडण्यात आली.
- 2022 एक लवचिक ग्रहांच्या दिशेने एक शाश्वत आणि समान भविष्य सुनिश्चित करणे एक पाऊल आहे.

**शाश्वत विकासाकडे भारताचा सहभाग व वाटचाल:-**

भारताने जागतिक स्तरावर शाश्वत विकासाच्या प्रक्रियेत आपला सहभाग दर्शविला व वेळोवेळी त्या दिशेने प्रयत्न केल्याचे दिसून येते जसे

- 1990 मध्ये हवामानातील बदल आपला अहवाल सादर केला त्या नंतर प्रत्येक पाच वर्षा नंतर पर्यावरणावर भारताने आपले अहवाल सादर केले त्यात विशेषतः 1990, 1996, 2000, 2008, 2014 उल्लेख आढळतो याच पाच अहवाल आधारे भारत शाश्वत विकासाकडे अग्रेसर असल्याचे दिसून येते.
- 2015 मध्ये भारताने युनायटेड नेशन च्या जनरल असेंबलीत शाश्वत विकासासाठी 2030 पर्यंत पुर्ण करण्यीचा अजेंडा स्विकृती दिली त्यातील सर्व 17 शाश्वत विकासाची ध्येय आत्मसात केली आहे. ज्यात कोणालाही मागे न ठेवता वर्ष 2030 पर्यंत शाश्वत विकास ध्येय साध्य करायचे आहे ज्यात गरिबी , भूक,चांगले आरोग्य आणि कल्याण , गुणवत्ता शिक्षण,लिंग समानता, स्वच्छ पाणी आणि स्वच्छता, परवडणारी स्वच्छ ऊर्जा, शाश्वत विकासाच्या दृष्टीने भारताचे विश्लेषण कार्य आणि आर्थिक वाढ, उद्योग नावीन्य आणि पायाभूत सुविधा, कमी असमानता, शाश्वत शहरे आणि समुदाय, जबाबदार वापर आणि उत्पादन, हवामान क्रिया पाण्याखालील जीवन, लाईफ अँड लँड,शांतता आणि न्याय, ध्येय साध्य करण्यासाठी भागीदारी इत्यादींचा समावेश आहे.
- भारताने वेळोवेळी राष्ट्र हिताच्या दृष्टीने कार्य बघता ऊर्जेच्या क्षेत्रात भारतातील टाटा एनर्जी रिसर्च इन्स्टिट्यूट ही संस्था 1974 पासून कार्यरत आहे ज्याचा मुख्य उद्देश स्वस्त ऊर्जा पर्यावरण आणि शाश्वत विकास केंद्राची स्थापना करणे आहे ही भारतात केरळ सरकारच्या सोसायटी नोंदणी कायद्या अंतर्गत नोंदणीकृत असलेली ही बिगर सरकारी संस्था (स्वयम् सेवी संस्था) द्वारे पर्यावरण आणि शाश्वत विकास केंद्र म्हणून कार्य करीत आहे. ही पर्यावरण आणि वन मंत्रालयाच्या केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, दिल्ली त्या अंतर्गत येते.
- केंद्रीय स्तरावर शाश्वत विकासाच्या दृष्टीने अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सी म्हणून नीति आयोग कडे जबाबदारी देण्यात आली आहे. नीति आयोगाने शाश्वत विकासाची उद्दिष्टे आणि त्या उद्दिष्टांच्या संबंधित योजना निश्चित केल्या आहेत ज्यात स्वच्छ भारत, ‘मेक इन इंडिया‘, स्किल इंडिया आणि डिजिटल इंडिया यासारख्या अनेक प्रमुख सरकारी कार्यक्रम शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांच्या मुळाशी आहे. ज्यात संयुक्त राष्ट्र राज्य सरकारला

शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मदत करीत आहे ज्याद्वारे राज्यपातळीवर विकासाची मोठी आव्हाने सोडवता येतील.

- गुगळे विजयहरियाली हा एक पाणलोट विकास आणि व्यवस्थापन कार्यक्रम आखण्यात आला व तो केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त विद्यमाने राबविला जात आहे याचा उद्देश पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविणे या अंतर्गत पाणलोट क्षेत्रात बचत गटांनची स्थापना करणे व त्याची अंमलबजावणी जिल्हा परिषद व डी आर डी ए यांच्या माध्यमातून करीत आहे.
- आंध्रप्रदेशात नीरू मारू च्या अंतर्गत लोक सहभागातून लोक तलाव खोदणे व जल संचयनाची कामे हाती घेण्यात आली आहेत.
- राजस्थान मध्ये शाश्वत विकासा अंतर्गत आखरी पाणी संसद कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

**2015 मधील शाश्वत विकास उदिष्टे:-**

सप्टेंबर 2015 मध्ये संयुक्त राष्ट्र च्या आमसभेत शाश्वत विकासाची उद्दिष्टे 17 मांडण्यात आली ही उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी प्रत्येक देशांच्या शासनांच्या बरोबरीने विकासातील अन्य भागीदारी सुद्धा करावयाची आहे यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहे या उद्दिष्टांचे पाच भागात विभाजन केले आहे .मानवी विकास ,पृथ्वी रक्षण, समृद्धी, जागतिक शांतता आणि जागतिक भागीदारी.

- **मानवी विकास**:-गरिबी संपूर्ण उच्चाटन,व्यक्ती भुकेला राहणार नाही याचे व्यवस्थापन करणे, सर्वांना सुखकर गुणवत्ता पुर्ण व आरोग्यदायी जीवन मिळावे, विषमता दूर करावी, शुद्ध पाणी व स्वच्छता मिळावी.
- **पृथ्वी रक्षण**:-हवामानातील बदलांचे परिणाम कमी करणे ,पाण्यातील जीवनाचे संरक्षण, स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढवणे, मानवी उपभोगा मध्ये संयम आणणे.
- **समृद्धी**:- तिचा शाश्वत पुरवठा आर्थिक विकासाच्या जोडीला सगळ्यांना समाधान जनक काम मिळणे, उद्योगांमध्ये शाश्वत तत्वाचा वापर, पर्यावरणाची हानी न होता समाजाला गरजेच्या पायाभूत सुविधा तयार करावे आणि शहरातील व्यवस्था शाश्वत बनवण्यासाठी विशेष लक्ष देणे.
- **जागतिक शांतता**:- न्याय व शांतता राखण्यासाठी न्याय व त्यासाठी गरजेच्या संस्थात्मक रचना करणे
- **जागतिक भागीदारी**:-. दैनिक माहितीची तंत्रज्ञानाच्या आदान प्रदानासाठी आणि आर्थिक मदतीच्या सतत पुरवठ्यासाठी व्यापारा मधील विकासानशील देशांचा वाटा वाढविण्यासाठी भागीदारी त्यात अनपेक्षित आहे.

2015 साली शाश्वत विकासाच्या ध्येयाने गती प्राप्त झाली शहरात पासून गावा पर्यंत सर्व क्षेत्रांचा विचार करण्यात आला ज्यात कृषिक्षेत्राला शाश्वत विकासाकडे वळविण्यात आले शाश्वत विकासाचे उद्दिष्ट स्वीकारताना भविष्यातील आपल्या वाटचालीला दिशा देण्यासाठी यांचा मोठा उपयोग होईल असा विश्वास स्वीकारताना सर्व सदस्य देशांनी दर्शविला शासन व्यवस्था, मोठे उद्योग यांच्या प्रयत्नां बरोबरच सामान्य लोकांनी केलेल्या छोट्या छोट्या प्रयत्नांना सुद्धा तेवढेच महत्त्व या उद्दिष्टात देण्यात आले आजच्या आधुनिक युगात शाश्वत विकास ही संकल्पना अतिशय महत्त्वाची आहे.

**शाश्वत विकासाच्या दृष्टीने भारताचे विश्लेषण:-**

भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात शाश्वत विकास होईल का? हा मोठा प्रश्न आहे झाल्यास तो कसा? यावर विचार मंथन करने आवश्यक आहे शाश्वत विकासाने आर्थिक प्रगती केली जाणे शक्य आहे पण ती तिव्र गतीने होईल हे सांगता येणार नाही गरीब देशाच्या अर्थव्यवस्थेत पासून उच्च उत्पादनाच्या अर्थव्यवस्थे पर्यंतच्या राष्ट्राच्या जीवन शैलीची ही वाढ आहे ही सतत तांत्रिक नवकल्पना आणि औद्योगिक उन्नती सह स्ट्रक्चरल ट्रान्सफॉर्मेशन प्रक्रिया आहे ज्यामुळे कामगार उत्पादकता वाढते आणि पायाभूत सुविधा आणि संस्थेत सुधारणा होते ज्यामुळे व्यवहाराची किंमत कमी होते मानवी विकासाच्या दृष्टीने बघता लोकांच्या आयुष्यामध्ये सुधारणा करण्याकडे लक्ष केंद्रित करण्याऐवजी आर्थिक वाढ सर्वांच्या भल्यासाठी होईल या कडे लक्ष देणे.माणूस शाश्वत विकासात श्रीमंतीपेक्षा मानवी जीवनात श्रीमंती वाढविण्यावर विशेष भर देणे आवश्यक आहे.

**संदर्भग्रंथ:-**

1. कदम, प्रतिभा ,शाश्वत विकास: ध्येय व ओळख,नित्या प्रकाशन,2021.
2. दुबळे, विजय, शाश्वत ग्रामीण विकास, प्रशांत पब्लिशर्स, औरंगाबाद,2000.
3. ढमढेरे,एस.व्ही., शाश्वत विकास आणि भारत, डायमंड पब्लिशर्स, पुणे.
4. पाटील व्हा. जे., शाश्वतता आणि विकास, प्रशांत पब्लिशर्स, औरंगाबाद.
5. वानखेडे, दत्ता, शाश्वत विकास,पी बी ओं.